

ताराराणी विद्यापीठ : (कै.) डॉ. व्ही. टी. पाटील यांच्या अकराव्या स्मृतीदिन कार्यक्रमात बोलताना कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे. शेजारी प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, माजी कुलगुरू रा. कृ. कणबरकर, शिवराज जगदाळे, रामराव बेनाडीकर, सौ. राजलक्ष्मी जाधव, माजी मुख्याध्यापिका विजयामाला निकम-पाटील.

सकाळ
१८ जाने०५

# व्ही. टी. पाटील यांचे शैक्षणिक कार्य आदर्शवत

## डॉ. साळुंखे यांचे मत

**सकाळ वृत्तसेवा**

**कोल्हापूर** : मुलींच्या भविष्याचा वेध घेत डॉ. व्ही. टी. पाटील यांनी केलेले शैक्षणिक कार्य आदर्शवत आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी आज (ता. १७) येथे केले.

येथील ताराराणी विद्यापीठात संस्थापक अध्यक्ष डॉ. व्ही. टी. पाटील यांच्या अकराव्या स्मृतीदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कमला कॉलेजचे प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील होते. कॉलेजच्या मैदानावर कार्यक्रम झाला.

श्री. साळुंखे म्हणाले, ''श्री. पाटील यांच्या कामात बहुजन समाजाच्या उत्कर्षाचा विचार होता. ज्या वेळी महिलांना शिक्षणापासून वंचित ठेवले जात होते, त्या काळात त्यांनी महिलांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. त्यांनी केलेली शैक्षणिक क्रांती कौतुकास्पद आहे. त्यांच्याच विचारावर आजही संस्थेचे कार्य अखंड चालू आहे. मुलींनी याच विचाराचा अंगीकार करत नवनवीन क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवावा.''

ते म्हणाले, ''विविध क्षेत्रांत मुलींना नोकरीच्या संधी आहेत; मात्र त्यासाठी फक्त पदवीपर्यंतचे शिक्षण उपयोगी ठरणार नाही. मुलींनी नवनवीन कौशल्ये आत्मसात करण्याची आवश्यकता आहे. विविध अभ्यासक्रमांचे शिक्षण घेतले पाहिजे.''

प्रारंभी श्री. साळुंखे यांनी श्री. पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन केले. प्राचार्य पाटील यांनी प्रास्ताविक केले. या प्रसंगी माजी कुलगुरू रा. कृ. कणबरकर, रामराव बेनाडीकर, सौ. राजलक्ष्मी जाधव, माजी मुख्याध्यापिका श्रीमती विजयामाला निकम-पाटील, शिवराज जगदाळे उपस्थित होते. प्रा. श्रीमती तेजस्विनी मुडेकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. जयसिंग सावंत यांनी आभार मानले.